# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभाग

## नेहमी विचारले जाणारे प्रश्न

फेब्रुवारी 2022

**विभागात कोणते अभ्यासक्रम चालतात ?**

विभागातर्फे 4 अभ्यासक्रम चालविले जातात.

1) एमए (जेएमसी): 2 वर्षांचा (4 शैक्षणिक सत्रे) पूर्णवेळ पदवी अभ्यासक्रम.

2) पदव्युत्तर वृत्तपत्रविद्या पदविका: 1 वर्षाचा फक्त मराठीतून चालणारा अर्धवेळ अभ्यासक्रम.

3) पदव्युत्तर मास मीडिया पदविका: 1 वर्षाचा इंग्रजीतून चालणारा अर्धवेळ अभ्यासक्रम.

4)पदव्युत्तर फोटोजर्नलिजम प्रमाणपत्र अभ्यासक्रम: अर्धवेळ आणि फक्त शनिवार - रविवारी चालणारा एका सत्राचा अभ्यासक्रम.

पीएचडी (संशोधनपर अभ्यासक्रम).

**प्रवेशासाठी पात्रतेचे निकष काय आहेत?**

1) पीएचडी अभ्यासक्रमासाठी संज्ञापन व पत्रकारितेतील पदव्युत्तर पदवी आवश्यक

2) इतर सर्व अभ्यासक्रमांसाठी कोणत्याही शाखेची पदवी आवश्यक

**प्रत्येक अभ्यासक्रमासाठी किती जागा आहेत?**

1) एमए (जेएमसी): 36 (आरक्षणाचे नियम लाग)

2) पदव्युत्तर वृत्तपत्रविद्या पदविका: 40 (आरक्षणाचे नियम लागू)

3) पदव्युत्तर मास मीडिया पदविका: 40 (आरक्षणाचे नियम लागू)

4) पदव्युत्तर फोटोजर्नलिज्म प्रमाणपत्र अभ्यासक्रम: 40 (आरक्षणाचे नियम लागू)

पीएचडी अभ्यासक्रमाची प्रवेशप्रक्रिया जागांच्या उपलब्धतेनुसार जाहीर करण्यात येते.

**प्रवेश प्रक्रिया कधी व कशी होते?**

सर्व अभ्यासक्रमांसाठीची (पीएचडीखेरीज) प्रवेशप्रक्रिया मे महिन्यात सुरू होते.

प्रवेश अर्ज ऑनलाइन पद्धतीने भरावे लागतात.

फक्त प्रवेश परीक्षेतील गुणांच्याच आधारे प्रवेश दिले जातात.

**प्रवेश परीक्षा कशी घेतली जाते ?**

वस्तुनिष्ठ बहुपर्यायी आणि ऑनलाईन माध्यमातून प्रवेश परीक्षा घेतली जाते.

**प्रवेश परीक्षेचे स्वरूप कसे असेल?**

शैक्षणिक वर्ष 2022- 23 च्या प्रवेशावेळी परीक्षेचे तपशील जाहीर केले जातील.

पण साधारणतः भाषिक कौशल्ये, सामान्यज्ञान, माध्यमविषयक घडामोडी, तर्कसंगत विचार इ.बाबत वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न विचारले जातात.

| |
|---|
| **प्रवेश परीक्षेच्या  मागील वर्षीच्या प्रश्नपत्रिका कुठे पाहायला मिळतील?** |
| www.unipune.ac.in > Academics > Department > Interdisciplinary Studies > Communication and Journalism > Sample Entrance Test Questions. |
| **अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक शुल्क किती असेल?** |
| शैक्षणिक शुल्कात बदल होण्याची शक्यता असल्याकारणाने शुल्काची नेमकी रक्कम सांगता येणार नाही. मागील वर्षापर्यंत अंदाजे रु. १०००० इतके शुल्क होते. (फोटो जर्नलिजम- रु.१५०००) |
| **पदविका अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर नोकरीच्या संधी उपलब्ध होतात का?** |
| होय. पदविका अभ्यासक्रम पूर्ण केलेले अनेक विद्यार्थी प्रथितयश माध्यमसमूहात काम करत असून या क्षेत्रात काम करण्यासाठी आवश्यक त्या सर्व कौशल्यांचा अंतर्भाव अभ्यासक्रमात आहे. |
| **दोन पदविका अभ्यासक्रमांमध्ये नेमका फरक काय?** |
| पदव्युत्तर वृत्तपत्रविद्या पदविका हा प्रामुख्याने पत्रकारितेशी निगडीत अभ्यासक्रम असून फक्त मराठी माध्यमातूनच सकाळी 8 ते 10.30 यावेळेत चालविला जातो.<br>पदव्युत्तर मास मीडिया पदविका हा अभ्यासक्रम संपूर्ण माध्यम क्षेत्राशी निगडीत असून इंग्रजी  माध्यमातून चालतो. (विद्यार्थी मराठीतून परीक्षा देऊ शकतात)  संध्याकाळी 6 ते 8.30 या वेळेत तो चालविला जातो. |
| **विभागामार्फत चालविणाऱ्या अभ्यासक्रमांचे विस्तृत स्वरूप कुठे पाहायला मिळेल?** |
| www.unipune.ac.in > Academics > Department > Interdisciplinary Studies > Communication and Journalism > Syllabus |
| **अभ्यासक्रम ऑनलाईन किंवा मिश्र पद्धतीने शिकवले जातात का?** |
| करोना विषाणू प्रादुर्भावासारख्या आपत्तीजनक परिस्थितीचा अपवाद वगळता **अभ्यासक्रम पूर्णतः ऑफलाईन  पद्धतीनेच चालविले जातील.** त्या त्या वेळी उद्भवणाऱ्या परिस्थितीनुसार ऑफलाईन किंवा ऑनलाईन बाबत निर्णय घेतले जातील. |
| **उपस्थिती बंधनकारक आहे का?** |
| परीक्षा देण्यासाठी 75% उपस्थिती अनिवार्य आहे. |
| **विभागात प्लेसमेंट कक्ष आहे का? आणि अभ्यासक्रमानंतर नोकरीची हमी मिळते का?** |
| विभागात प्लेसमेंट कक्ष चालविला जात नाही आणि नोकरीची कोणतीही हमी विभाग देत नाही. पण नेमणुकांसठी विविध माध्यमसमूह विभागाशी संपर्क साधतात, व त्यासाठी आवश्यक सुविधा विभागात उपलब्ध करून दिल्या जातात. |
| **वसतिगृहाची सुविधा उपलब्ध आहे का?** |
| वसतिगृहात मर्यादित जागा उपलब्ध असून फक्त एमए (जेमसी)च्या विद्यार्थ्यांसाठी त्या उपलब्ध आहेत. अर्धवेळ अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना वसतिगृहाची सुविधा उपलब्ध **नाही.** |

विभागप्रमुख

(head.dcj@gmail.com, 020-25654069)